# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gamil.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जा.क्र.10/एनजीपी/आधारकार्ड/2014/ ५
दिनांक : 8 JAN 2015

प्रति,
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, पुणे, मुंबई.

विषय- आपले विभागातंर्गत सर्व संस्थामधील विद्यार्थ्यांची आधारकार्डची नोंदणी मार्च- 2015 पर्यत पूर्ण करुन घेणे बाबत. .
संदर्भ- सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन पत्र क्र. बैठक-2014/प्र.क्र.154/ 14/समन्वय, दि. 05.12.2014

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत महाविद्यालये/ संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांची आधारकार्डची नोंदणी माहे मार्च-2015 पर्यत पूर्ण करण्याबाबत शासनाच्या उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आदेशित केलेले आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी पदविका अभ्यासक्रम राबविणा-या आपले विभागांतर्गत सर्व संस्थामधील विद्यार्थ्यांचे आधारकार्डची नोंदणी माहे मार्च-2015 पर्यत पूर्ण करण्याबाबत संबंधित संस्था प्रमुख/प्राचार्यांना आदेशित करण्यात यावे. तसेच संस्थेतील ठराविक संख्येच्या विद्यार्थ्यांची आधार कार्ड नोंदणी करावयाची असेल तर सदर संस्थेमध्ये आधार नोंदणीचे पथक पाठविण्याची विनंती स्थानिक अधिका-यांकडे करण्यात यावी. सदरची कार्यवाही माहे मार्च- 2015 पर्यत प्रथम प्राधान्याने पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

क्रमांकः-विकाअ/शिक्षण/आधारकार्ड/२०१५/१०२
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक १३/१/२०१५.

S P Pasebad
प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व शासकीय/अनुदानित / विना-अनुदानित / पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.